**Gallery:**

लोकमत सोलापूर, मंगळवार, दि. ३० जुलै २०१९ ३



अमेरिकन संस्थेकडून भेट दिलेल्या प्रिंटरसोबत डॉ. एम. ए. चौगुले, प्रा. एस. एन. उपाध्ये, प्राचार्या राजुला मॅक, प्रा. जे. एम. जाकेटिया, डॉ. एस. ए. पाटील, डॉ. व्ही. व्ही. पोतदार आदी.

# शांती शिक्षण मंडळास सॉफ्टवेअर प्रिंटर भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

सोलापूर : शांती शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची अमेरिकास्थित जनरल इलेक्ट्रॉनिक कंपनीकडून थ्रीडी प्रिंटर ग्रांट प्रोग्रामसाठी निवड करण्यात आली आहे. या अंतर्गत संस्थेला कंपनीकडून १ लाख ६० हजार रुपये किमतीचे प्रिंटर व सॉफ्टवेअर प्रदान करण्यात आल्याची माहिती कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी दिली.

या कंपनीकडून भारत देशातून ११ संस्थांची निवड करण्यात आली असून, राज्यातून निवड करण्यात आलेल्या संस्थांपैकी शांती शिक्षण प्रसारक मंडळ ही दुसरी संस्था आहे. हे प्रिंटर थ्री डायमेन्शन ऑब्जेक्ट अर्थात वेगवेगळे घटक संगणकाच्या नियंत्रणाखाली जोडून स्थिर करण्याचे काम करते.

यासाठी प्रा. एस. एस. उपाध्ये, प्राचार्या राजुला मॅक, ए. जी. पाटील तंत्रनिकेतनचे उपप्राचार्य प्रा. जे. एम. जाकेटिया, प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. एस. ए. पाटील, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष ए. जी. पाटील व सचिव एस. ए. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे. (वा.प्र.)

# ए. जी. पाटील पॉलिटेक्निकला मिळाले २१ लाख रुपयांचे सॉफ्टवेअर



सोलापूर : जागतिक पातळीवरील विविध कंपन्यांकडून मिळालेले सॉफ्टवेअर दाखवताना सचिव एस.ए. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य जे. एम. जाकेटिया व सर्व विभाग प्रमुख.

प्रतिनिधी
सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील नामांकित पॉलिटेक्निक संस्था अशी ओळख असलेल्या व राष्ट्रीय एनबीए मानांकन मिळवणाऱ्या ए. जी. पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट या संस्थेला जगभरातील विविध नामांकित कंपन्यांकडून एकूण २१ लाख रुपये किमतीचे सॉफ्टवेअर्स मिळाले असल्याची माहिती प्राचार्य व कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी दिली.

पॉलिटेक्निकच्या अभ्यासक्रमात उपयोगी असणाऱ्या अनेक सॉफ्टवेअर संस्थेस प्रामुख्याने अमेरिका, बेल्जियम, ऑस्ट्रिया, आयर्लंड, जर्मनी, फिनलँड, फ्रान्स व नेदरलँड येथील विविध नामांकित कंपन्यांकडून मिळाले आहे. या सर्व सॉफ्टवेअरचा उपयोग मेकॅनिकल, सिव्हील, कॉम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स अँन्ड टेलीकम्युनिकेशन या शाखेतील विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी व विविध इनोव्हेटिव्ह प्रकल्प तयार करण्यासाठी होणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

सदर सॉफ्टवेअर मिळविण्यासाठी मेकॅनिकल विभागाचे प्रा. एस. एन. उपाध्ये यांनी प्रयत्न केले असून त्यांना सर्व विभागाचे विभागप्रमुख, उपप्राचार्य जे. एम. जाकेटिया, प्राचार्य व कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष ए. जी. पाटील व सचिव एस. ए. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.




# ए.जी. पाटील पॉलिटेक्निकला मिळाले बीएमडब्ल्यूकडून डिझेल इंजिन, ट्रान्समिशन सिस्टीम

**प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. १२ जून -**

सोलापूर जिल्हयातील अग्रम नांकित 'ए.जी.पाटील पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट'ला बी.एम.डब्ल्यू या आंतरराष्ट्रीय कंपनीकडून बी.एम. डब्ल्यू. (मिनी कूपर) या कार मध्ये वापरले जाणारे डिझेल इंजिन मिळाले असून या इंजिनचा उपयोग मेकॅनिकल इंजिनियरींग व ऑटोमोबाईल इंजिनियरींग शाखेतील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसाठी होणार असून कंपनीमार्फत मुलांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले यांनी दिली.

यासाठी सोलापूर जिल्ह्यातून ए.जी. पाटील पॉलिटेक्नीक इन्स्टिट्यूट या एकमेव संस्थेची निवड झाली असून संस्थेस मागील वर्षी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च असे एनएबी मानांकन मिळालेले असल्याने कंपनीने या संस्थेची निवड केली असल्याची प्राचार्यांना माहिती दिली.

हे इंजिन व ट्रान्समिशन सिस्टिम मिळवण्यासाठी मेकॅनिकल विभागाचे प्रा.एस.एन. उपाध्ये यांनी प्रयत्न केले असून त्यांना विभाग प्रमुख प्रा.एस.के. मोहिते, उपप्राचार्य जे.एम.जाकेटिया व प्राचार्य डॉ. एम.ए.चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष ए.जी. पाटील व सचिव एस.ए.पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.